INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# स्त्रीमुक्ती चळवळ आणि सद्यस्थितीतील आव्हाने

प्रा. बाळकृष्ण कारू रामटेके
समाजशास्त्र विभाग प्रमुख
समर्थ महाविद्यालय लाखनी
मोबाईल क्रमांक : 9923340772
ई-मेल आयडी :ramtekebk@gmail.com

## प्रस्तावना

भारतामध्ये स्त्रीवादी चळवळीचा विकास विविध राजकीय पटलांमधून आणि स्त्रियांच्या शोषणाच्या विरोधातील विविध रूपातील चळवळी मधून झालेला दिसून येतो. स्त्रियांचे शोषण, लिंगभाव व लिंगभेद या मुद्द्यांवर स्त्रीवादी चळवळी उभ्या राहिलेले आहेत. स्त्रियांच्या शोषणाला प्रामुख्याने पुरुषप्रधान व्यवस्था, भांडवलशाही अर्थव्यवस्था अनेक जाती वर आधारित पदसोपानात्मक समाजरचना प्रामुख्याने कारणीभूत असते, यावर लक्ष केंद्रित झाले. स्त्रियांच्या शोषणाला पुरुषप्रधान भांडवली व्यवस्था जबाबदार असतेच असते , पण श्रम, उत्पादन, पुनरुत्पादन यातून घडणाऱ्या संरचनात्मक संस्था आहे कारणीभूत असतात, हे स्त्रीवादी चळवळीने अधोरेखित केले. स्त्रियांचे गृहकाम, कुटुंबातील लहान मुले, वयस्कर व्यक्ती यांचे संगोपन , शेतीत सहाय्यक म्हणून केलेली कामे, शेती संबंधित इतर कामे ही सर्व विनावेतन असतात. या दोन्ही स्वरूपातील कामांनी सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेला हातभार लागत असतो. याकडे स्त्रीवादी चळवळींनी लक्ष पुरविले आहे. पितृसत्ताक समाजामध्ये घरातील अथवा कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा आणि प्रमुख सामाजिक, आर्थिक, राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांना स्थान न मिळणे या मुद्द्यांवर ही स्त्रीवादी चळवळींनी विशेष लक्ष केंद्रित केलेले आहे. कुटुंबातर्गत होणारी हिंसा, लैंगिकता, लैंगिक संबंधातील शोषण हे जात, रुढी, परंपरा, संस्कृती या संस्थात्मक प्रारूपातून होते.

या संस्था टिकवण्यासाठी, प्रतिष्ठा वाढवण्यासाठी स्त्रियांना मोहरा म्हणून वापरले जाते. या प्रारूपातून स्त्रियांचे स्थान घडविले जाते. या विरुद्ध स्त्रीवादी चळवळी स्त्रियांच्या न्याय, समता, व्यक्ती म्हणून असलेले मूलभूत अधिकार यासाठी संघर्ष करीत होत्या , आजही संघर्ष करीत आहेत. या संघर्षात गरीब, ग्रामीण, शहरी, आदिवासी, शेतकरी, एलजीबीटीक्यआय याशिवाय परिवारातील व्यक्ती, मजूर स्त्रिया यांचा ही समावेश महत्त्वपूर्ण आहे. 1968 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून घोषित केले. त्याला 2024 मध्ये 56 वर्ष झाली. गेल्या 56 वर्षांमध्ये भारतीय स्त्री चळवळीने स्त्रियांचे समाजातील स्थान बदलविण्यासाठी केलेले लढे, स्त्रीचे आत्मभान जागविण्यासाठी आर्थिक आणि राजकीय हक्कांबाबत जागृती करण्यासाठी केलेले लढे, पुरुषांच्या

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

जगात आपलीही अर्धी जागा आहे याचे भान येण्यासाठी, समानता आणण्यासाठी आणि राजकीय व सामाजिक पातळीवर समान सामर्थ्याने येण्यासाठी श्री चळवळीने केलेले प्रयत्न यांचा आढावा घेणे, पुढील दिशा निश्चित करणे या गोष्टी आजही महत्त्वपूर्ण आहेत.

1974 मध्ये विना मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखाली  भारतामध्ये झालेल्या समितीने आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य, राजकारण आणि कायदा या सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रियांच्या स्थानाचा, त्यातील त्यांच्या सहभागाचा अहवाल तयार केला. 1921 च्या जनगणनेच्या आधारे त्यांची आकडेवारी त्यांनी शोधून काढली. हा अहवाल म्हणजे'तो टोवर्ड्स इक्वलिटी! या अहवालामध्ये दिसून आले की, स्त्री-पुरुष गुणोत्तर हे 1000 पुरुषांच्या मागे 932 स्त्रिया असे होते. ही विषमता स्पष्टपणे मांडण्यात आली. स्त्रियांविषयीच्या भेदभावाची तीव्रता स्त्री संघटनांपर्यंत पोहोचली.

प्रमिला दंडवते यांनी हुंडाविरोधी विधेयक मांडले. हुंडा घेणे वा देणे हा कायदेशीर गुन्हा ठरविण्यात आला. त्यावेळी हुंड्याच्या प्रथेमुळे स्त्रियांवरील अत्याचार वाढले होते. नववधूस जिवंत जाळणे, त्यांच्या शारीरिक आणि मानसिक छळ करणे, त्यांची हत्या करणे अशा मानवतेवर प्रश्नचिन्ह उमटविणाऱ्या घटना घडत होत्या. स्त्री चळवळीने हुंडा प्रथा विरोधी आंदोलने करून त्यास कायद्याचे संरक्षण दिले. हुंडा प्रथा बंदी आंदोलनामुळे स्त्रियांच्या कौटुंबिक हिंसाचारात वाचा फुटली. समाजात जागृती निर्माण करण्याचे, कायद्याचा वचक निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम या आंदोलनामुळे झाले.

कौटुंबिक हिंसाचाराबरोबर स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारा विरोधी स्त्री चळवळीने 1980 मध्ये आंदोलन केले. मथुरा नावाच्या महिलेवर पोलिसांनी पोलीस स्टेशनमध्ये बलात्कार केला होता. या घटनेमुळे स्त्रियांची सुरक्षितता, अधिकार आणि बलात्काराची परिभाषा दुरुस्त करण्याकडे स्त्री चळवळीला मोठ्या आव्हानाला सामोरे जावे लागले. राज्यसंस्था, न्यायव्यवस्था ह्या कशा पुरुषप्रधान मानसिकतेच्या भ्रष्ट व्यवस्था आहेत, याकडे लक्ष वेधले. स्त्रियांबरोबर शारीरिक संबंध हे विनासंमती जोर जबरदस्ती यांची पुनर व्याख्या करण्यात आली. काही वेळेस भीतीमुळे स्त्रिया अत्याचाराचा प्रतिकार करीत नव्हत्या याचा अर्थ त्यांची संमती आहे असा चुकीचा समज करून न घेता तो बलात्काराचा समजावा, असा महत्वपूर्ण निर्णय न्यायालयास देण्यास स्त्री चळवळीने भाग पाडले.

मथुरा बलात्कार घटनेच्या निमित्ताने स्त्री चळवळीने घेतलेला स्त्रियांविरोधी हिंसा व त्यांचे शोषण रोखण्यासाठी केलेल्या सामाजिक-सांस्कृतिक लढ्याच्या एक भाग आहे. तिने समाजातील पुरुषसत्ताक व्यवस्था , पुरुषी मानसिकता यांना प्रश्नांकित केले. पुरुषांची स्त्रियांकडे पाहण्याचे दृष्टी, तिच्याविषयीचे असलेले चुकीचे ग्रह बदलविण्यासाठी स्त्री चळवळीने सुरुवात केली. तसेच स्त्रियांनी बलात्कारासाठी स्वतःला दोष देणे थांबवावे यासाठी प्रयत्न केले. बलात्कार विषयक  कायद्यांमध्ये सुधारणा घडविण्यासाठी प्रयत्नशील राहणे हे अजूनही स्त्री चळवळी पुढे मोठे आव्हान आहे.

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

स्त्रियांच्या राजकीय सहभागासाठी स्त्री चळवळीने मोठ्या प्रमाणात लढा दिला. स्त्रियांच्या आत्मा भानासाठी, त्यांच्या सहअस्तित्व आणि व्यक्ती स्वातंत्र्यासाठी त्यांना राजकीय अधिकार असणे, तसेच त्यांच्यासाठी लोकसभा व विधानसभेत राखीव जागा असणे महत्त्वाचे आहे. पुरुष सत्ताक व्यवस्थेमध्ये या  राजकीय राखीव जागांमुळे स्त्रियांच्या राजकीय समानता, स्वातंत्र्य व अधिकार यांना प्राधान्य मिळते. यासाठी स्त्री चळवळीने स्त्रियांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राखीव जागा देण्याची मागणी केली. 73 व 74 व्या घटनादुरुस्तीने ही मागणी पूर्ण करण्यात आली. स्त्रियांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक तृतीयांश (33 टक्के) जागा राखून ठेवण्यात आल्या. या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनेक स्त्रिया प्रतिनिधी म्हणून निवडून आल्या. सुरुवातीला त्यांच्यापैकी अनेक जणी त्यांच्या घरातील पुरुषांच्या सल्ल्याने आणि हुकूमाने वागत असल्या, तरी नंतर काहीजणी स्वतंत्रपणे आपल्या अधिकारांचा वापर करण्यास शिकल्या. एक तृतीयांश राखीव जागांमुळे पुरुषांनी आपल्याच घरातील किंवा नात्यातील स्त्रियांना निवडणुकीत उभे करून राजकीय हक्क आपल्या ताब्यात ठेवले. तरीही स्त्रियांच्या राखीव जागांमुळे एक प्रकारे त्यांनी आपले राजकीय प्रभुत्व आणखी बळकट करण्याचा प्रयत्न केला.

राजस्थान मध्ये'आशा वर्कर्स'(आरोग्य सहाय्यक) असलेल्या भंवरी देवी यांच्यावर सामूहिक बलात्कार झाला. या प्रकरणामुळे कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक अत्याचारा विरोधात आवाज उठविण्यात आला. यातून 1997 मध्ये विशाखा मार्गदर्शक तत्वे लागू करण्यात आले. भंवरी देवीने बालविवाह सारख्या प्रथेला विरोध केला, म्हणून तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. स्त्रियांचा सामूहिक वावर आणि त्यांची निर्णय क्षमता ताब्यात ठेवण्यासाठी, त्यांचे आत्मबल, आत्मसन्मान चिरडून टाकण्यासाठी त्यांच्या'इज्जतीवर'घाला घातला जातो. हे लक्षात घेऊन स्त्रीवादी संघटनांनी मोठ्या प्रमाणात आंदोलने करून कामाच्या ठिकाणी स्त्रियांना सुरक्षितता व स्वातंत्र्य मिळेल, असे प्रयत्न केले त्यासाठी विशाखा मार्गदर्शक तत्वे न्यायालयाकडून लागू करण्यात आली. स्त्रीवादी विचारसरणीला निश्चित अशी एक राजकीय दिशा आहे. स्त्रीवाद ही केवळ एक समाजशास्त्रीय संकल्पना नाही तर खाजगी, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवर होणाऱ्या स्त्रियांच्या दडपणुकीबद्दल जाणीव निर्माण करणे व त्याचबरोबरया दड पणुकी विरुद्ध संघर्ष करणे हा स्त्रीवादाचा अर्थ आहे. स्त्रीवादी चळवळीने पुरुषसत्ताक व्यवस्थेला मूलभूत प्रश्न विचारले आहेत. चिपको आंदोलनातून पर्यावरणाचा प्रश्न व रोजगाराचा महत्त्वाच्या प्रश्न स्त्री आंदोलकांकडून लढवला गेला. या चळवळीमध्ये स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. तो त्यांच्या जीवनाशी निगडित असा प्रश्न होता. शहादा येथील आदिवासींसाठी जमिनीचा प्रश्न मोठा होताच, पण तो प्रस्थापितांविरोधाचाही लढा होता. या आंदोलनामध्ये आदिवासी स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. स्त्रियांचे काम, रोजगार आणि रोजचे जगणे यातील त्यांच्या सहभागाचाही प्रश्न होता . दारूबंदी घरगुती हिंसा हे प्रश्न मांडले गेले

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

' समता आंदोलना 'च्या वतीने परित्यक्ता स्त्रियांची देशातील पहिली परिषद संगमनेरला 20 मार्च 1988 रोजी झाली. या परिषदेत परित्यक्ता स्त्रियांना स्वतंत्र रेशन कार्ड, पालकत्वाचा अधिकार, रोजगार, त्यांच्या मुलांना शासकीय वस्तीगृहातील तीन टक्के राखीव जागा, सरकारी गृह योजनेत प्राधान्य, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. या मागण्यांसाठी आणि'समता आंदोलना' च्या पुढाकाराने 5 मे 1990 मध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये अडीच हजार स्त्री-पुरुषांचामोर्चा काढण्यात आला. त्यानंतर10 ते मार्च 1991 मध्ये पुणे, नाशिक, मुंबई येथे परित्यक्ता स्त्री यात्रा काढण्यात आली. परित्यक्ता स्त्रियांची चळवळ महाराष्ट्रातील अहमदनगर, सांगली आणि धुळे जिल्ह्यात प्रामुख्याने उभे राहिली. अँड. निशा शिवूरकर, इंदुताई पाटणकर, विजया चौक यांच्या या चळवळीत पाठिंबा होता.

## स्त्री चळवळी समोरील आव्हाने

मंडल आयोगामुळे छोट्या- छोट्या जातींना , इतर मागास जातींना आत्मभान मिळाले. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली नवीन बाजारपेठ, नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर त्याचे आव्हान पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांना व छोटे उद्योगधंदे चालवणाऱ्यांना पेलता येऊ शकले नाही. घरातील पुरुषांना, स्त्रियांना नोकऱ्या नाहीत, अशी परिस्थिती निर्माण झाली. त्याचे गंभीर परिणाम समाजामध्ये दिसू लागले. कौटुंबिक हिंसाचार, हुंड्याची लपून छपून देवघेव करणे, कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार अशा अनेक घटना घडल्या. पुरुषांच्या नोकऱ्या, व्यवसायाचे क्षेत्र मर्यादित होऊ लागल्यामुळे पुरुषी मानसिकता स्त्रियांच्या नोकरी आणि त्यांच्या सार्वजनिक वावरास घाला घालू लागल्या. जागतिकीकरणामुळे जग जवळ आले: पण त्यामुळे येथील पारंपारिक, सांस्कृतिक सामाजिक व्यवस्था विस्कळीत झाली. नवनवीन स्वप्न आणि तुमच्या गरजांपालीकडील वस्तूंचे आकर्षण आणि वितरण होत गेले. छोटे शेतकरी, गरीब मजूर, मध्यम वर्गाची ती स्वप्ने विकत घेण्याची क्षमता न वाढ ल्यामुळे समाज अति श्रीमंत व अति गरीब या दोन विभागात विभागला गेला. स्वतःची आर्थिक क्षमता वाढविण्यासाठी गरीब वर्ग गावे सोडून शहरांकडे रोजगारासाठी स्थलांतर करू लागला. लहान-मध्यम शेतकरी गावाकडील शेत जमिनी विकून त्यातून नवीन उद्योगधंदे निर्माण करू लागले. पण ते उद्योगधंदे शहरी गरजा आणि बाजारपेठेला शह देऊ शकले नाहीत. या सर्वांमध्ये स्त्रियांच्या रोजगारांचा प्रश्न निर्माण झाला कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या प्रश्नांवर काम करण्याचे मोठे आव्हान स्त्री चळवळी कुठे आहे.

नवीन शैक्षणिक धोरणामुळे तर स्त्रियांच्या शैक्षणिक वाटचालीला अनेक अडथळयांना सामोरे जावे लागणार आहे. उदा. रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाचा अभाव, ग्रामीण भागातील शाळांमध्ये दहावीनंतर  मुलींची गळती, शाळेतील प्राथमिक सुविधांची कमतरता, अपुरा आणि अनियमित

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

शिक्षक वर्ग इत्यादी. बाजारपेठी राजकीय, आर्थिक परिस्थितीमध्ये तेही शक्य होऊ शकणार नाही. त्याचे फार मोठे आव्हान नजीकच्या काळात स्त्री चळवळी पुढे आहे.

मंडल आयोगानंतर इतर मागासवर्गीय जातींचा प्रश्न हा महत्त्वाचा राजकीय मुद्दा झाला. दलित आणि कनिष्ठ जातीतील ओबीसी स्त्री गट असे स्वायत्त गट निर्माण झाले. त्यांनी त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय जात अस्तित्वाचे आणि अस्मितांचे प्रश्न मांडले. परंतु समग्र स्त्री चळवळ संघटित करण्याचे आव्हान निर्माण झाले. दलित स्त्रियांचे प्रश्न एरणीवर मांडण्यात दलित स्त्री चळवळीने प्राधान्य दिले. स्त्री चळवळीने स्त्रियांसाठी न्याय, कायद्यातील बदल, राजकीय सत्तेमधील वाटा आणि स्त्री केंद्रीय धोरणे मिळविण्यासाठी केलेला संघर्ष यशस्वी झाला असे म्हणता येते. हुंडाबंदी कायदा, गर्भलिंग चिकित्सा, बलात्कार विरोधी कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, कामाच्या ठिकाणी स्त्रियांना संरक्षण देणारा कायदा असे अनेक कायदे स्त्रियांसाठी आणि त्यांच्या सबलीकरणासाठी, विकासासाठी करणे सरकारला भाग पडले, इस्त्री चळवळीमुळे हे लक्षात घेतले पाहिजे.

साहित्य ,कला , विज्ञान, उद्योग, शिक्षण अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील स्त्रियांचे कर्तेपण, त्यांचे योगदान यांचे विश्लेषण करण्यास इतिहासामध्ये तिचा ही सहभाग होता . त्यांच्या संघर्ष गाथांचा अभ्यास करण्यासाठी, तिच्या योगदानाला समाजामध्ये उजाळा देण्यासाठी, त्यांच्या क्षमता आणि विचारसरणी बद्दल पसरवलेली मिथके दूर करण्यासाठी , त्यांच्या न्याय हक्कांसाठी, समाजातील पुरुषप्रधान व्यवस्थेचा सखोल अभ्यास करण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्र वेगवेगळ्या विद्यापीठात सुरू झाली. हेही स्त्री चळवळीचे योगदान आहे. सध्या सगळीकडे जातीय आणि धार्मिक उन्माद दिसून येत आहे. धार्मिक आक्रमकता आणि मूलतत्त्ववाद उफाळला आहे. जातीभेद, प्रांतिक अस्मिता, जातीय अस्मिता जोर धरू लागले आहेत. वेगवेगळ्या जातींचे मोर्चे त्यांच्या अस्मिता ठळक करण्याचा प्रयत्न करत आहेत. उदा. मराठा क्रांती मोर्चा, यामध्ये स्त्रियांच्या पुढाकार मोठ्या प्रमाणात होता. त्यांचा सहभाग आक्रमक आणि पुरुषप्रधान व्यवस्थेला भक्कम करणारा, जात अस्मितांचे झेंडे उभारणारा आहे. भारतीय संविधान लोकशाही, धर्मनिरपेक्षता या सर्वांना राष्ट्रीय धोका निर्माण झाला आहे. स्त्रियांचे समाज माध्यमाद्वारे, जाहिरातीद्वारे होणारे विकृतीकरण आणि वस्तूकरण, स्त्रीच्या शरीराला, सौंदर्याला दिले जाणारे महत्त्व यात स्त्रियांची प्रतिमा उपभोग्य वस्तू अशी तयार केली आहे.LGBTGI +समुदायातील व्यक्तींना स्त्री चळवळीमध्ये सामील करून घेऊन त्यांचे प्रश्न एरणीवर आणणे, त्यांचे विचार, अनुभव, प्रश्न समजून घेऊन त्यांच्या सोबतीने लढा देणे आवश्यक आहे. स्त्रीवादी चळवळी पुढे कुटुंब, विवाह, जात, धर्म, समूह, संस्कृती, लैंगिकता, श्रम आणि हिंसा या मुद्द्यांवर वेगळी व्यापक अशी चळवळ उभी करण्याचे मोठे आव्हान आहे.

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

## सारांश

सद्यस्थितीत जगभर युद्धाचे वातावरण आहे. कोणत्याही युद्धाचा परिणाम म्हणजे स्त्रिया पुन्हा एकदा रोजगार, कुटुंबाची सुरक्षा आणि पुरुषप्रधान समाजाची बंधने यात अडकून जातात. याशिवाय पर्यावरण, शेती विषयक समस्या नव्याने उद्भवू लागल्या आहेत. पर्यावरणातील बदल, शेती मधले अरिष्ट हे नव भांडवली आर्थिक धोरणामुळे निर्माण झाले आहे. शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहेत, अशा स्थिती त्या शेतकऱ्यांच्या मागे राहिलेल्या त्यांच्या बायका -मुलांचे प्रश्न सोडविण्याचे मोठे आव्हान स्त्री चळवळी पुढे आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

1) सत्याग्रही विचारधारा:-ऑक्टोंबर-नोव्हेंबर 2025 (मासिक) पृष्ठ क्रमांक 128 ते 133

Received: 03-03-2026 | Accepted: 08-04-2026 | Published: 16-04-2026 | www.ijeml.com